# CS (MAIN) Exam : 2017

## मराठी (प्रश्न-पत्र–I)

( साहित्य )

| वेळ : तीन तास | कमाल अंक : 250 |
|---|---|

### प्रश्नपत्रिकेबाबतच्या ठळक सूचना

**उत्तरपत्रिका लिहिण्यापूर्वी कृपया पुढील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात**

आठ प्रश्नांची विभागणी दोन भागांमध्ये केलेली आहे.

उमेदवाराला एकूण **पाच** प्रश्न सोडवावयाचे आहेत.

प्रश्न क्रमांक **1** आणि **5** हे अनिवार्य आहेत. आणि उर्वरित प्रश्नांपैकी **तीन** प्रश्न सोडवताना प्रत्येक विभागातील किमान **एक** तरी प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

प्रश्नासमोर गुण दिलेले आहेत.

मराठीतच उत्तरे लिहावीत.

ज्या प्रश्नांमध्ये शब्दमर्यादा उल्लेखलेली असेल, तिचे कटाक्षाने पालन करावे.

प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न अनुक्रमानेच गृहीत धरले जातील. एखाद्या प्रश्नाचा अंश जरी सोडविलेला असेल, तरी जर तो खोडलेला नसेल तर गृहीत धरला जाईल. कोणतेही पृष्ठ अथवा पृष्ठाचा काही भाग प्रश्नोत्तरपुस्तिकेत कोरा सोडला असेल, तर त्यावर काट मारावी.

## MARATHI (PAPER—I)

( LITERATURE )

| Time Allowed : Three Hours | Maximum Marks : 250 |
|---|---|

### QUESTION PAPER SPECIFIC INSTRUCTIONS

**Please read each of the following instructions carefully before attempting questions**

There are EIGHT questions divided in two Sections.

Candidate has to attempt FIVE questions in all.

Question Nos. **1** and **5** are compulsory and out of the remaining, THREE are to be attempted choosing at least ONE question from each Section.

The number of marks carried by a question/part is indicated against it.

Answers must be written in MARATHI.

Word limit in questions, wherever specified, should be adhered to.

Attempts of questions shall be counted in sequential order. Unless struck off, attempt of a question shall be counted even if attempted partly. Any page or portion of the page left blank in the Question-cum-Answer Booklet must be clearly struck off.

## SECTION—A

**1.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशे पन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) भाषेचे स्वरूप स्पष्ट करा.

(*b*) दैनंदिन व्यवहारातील भाषेपेक्षा काव्यात्म भाषेचे वेगळेपण कोणते?

(*c*) आहेराणी बोलीचे प्रमुख विशेष सांगा.

(*d*) मराठीतील विभक्तींचे प्रत्यय आणि त्यांचे कारकार्य विशद करा.

(*e*) 'लोकगीत' ही संकल्पना स्पष्ट करा.

**2.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) सोत्यूर आणि चॉम्स्की ह्या भाषावैज्ञानिकांच्या भाषाविषयक संकल्पना विस्ताराने स्पष्ट करा. 20

(*b*) सतराव्या शतकातील मराठी भाषेचे विशेष सोदाहरण विशद करा. 15

(*c*) लोककथांमधील आशयवैविध्याचे विश्लेषण करा. 15

**3.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) ''भाषा ही यांत्रिक स्वरूपाची नसते, हा भाषिक संरचनेचा सर्वात महत्त्वाचा गुणधर्म होय.'' साधार स्पष्ट करा. 20

(*b*) प्रमाण भाषेचे समाजव्यवहारातील महत्त्व विशद करा. 15

(*c*) क्रियाविशेषण अव्यये म्हणजे काय, ते उदाहरणांसह सांगा. 15

**4.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) तेराव्या शतकातील मराठी भाषेची कोणती वैशिष्ट्ये नंतरच्या काळात बदलत गेली, त्यांचा आढावा घ्या. 20

(*b*) बोली निर्माण होण्यामागील कारणे स्पष्ट करा. 15

(*c*) डांगी ह्या बोलीचे स्वरूप स्पष्ट करून तिच्या विषयीच्या वादाची माहिती द्या. 15

## SECTION—B

**5.** पुढील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे एकशे पन्नास (*150*) शब्दांत लिहा : 10×5=50

(*a*) म्हाइंभटांच्या ग्रंथांचा परिचय करून द्या.

(*b*) ''ज्ञानदेवें रचिला पाया.'' ह्या उक्तीचे मर्म विशद करा.

(*c*) पंडिती काव्य संतकाव्याहून वेगळे कसे?

(*d*) स्त्रीवादी साहित्याचे विशेष सांगा.

(*e*) साहित्य आणि समाज ह्यांच्या परस्परसंबंधावर प्रकाश टाका.

**6.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) शाहिरी काव्याचे संतकाव्याहून आणि पंडिती काव्याहून असलेले वेगळेपण विशद करा. 20

(*b*) साहित्यसमीक्षेचे साहित्याच्या क्षेत्रातील स्थान अधोरेखित करा. 15

(*c*) मराठी कवितेच्या क्षेत्रातील बा. सी. मर्ढेकरांचे योगदान स्पष्ट करा. 15

**7.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) बखरवाङ्मयाचे गुणदोष विस्ताराने विशद करा. 20

(*b*) ''मराठी लघुकथेचे जनक ना. सी. फडके होत.'' ह्या मताची साधक-बाधक चर्चा करा. 15

(*c*) ''मराठीत 'गझल'हा काव्यप्रकार सुरेश भटांमुळे लोकप्रिय झाला.'' स्पष्ट करा. 15

**8.** पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा :

(*a*) महानुभावांच्या 'माती ग्रंथां'चा परामर्श घ्या. 20

(*b*) दलित साहित्याची पृथगात्मता विशद करा. 15

(*c*) साहित्यसमीक्षेच्या पद्धतींचा परिचय करून द्या. 15

★★★